# मंदिरात केली भाऊबीज

- मंगला पटवर्धन, गोवंडी, मुंबई



दोन महिन्यांपूर्वी भाऊबीज झाली आणि मागच्या वर्षी गिरगाव चौपाटीवरच्या बाबुलनाथाच्या देवळात केलेली भाऊबीज आठवली. माझी मोठी बहीण बेबी हिला वयाच्या 79व्या वर्षी मागच्या 1 जूनला देवाज्ञा झाली. काल भावाचा फोन आला. ह्यावर्षी येत नाही. सहाजिकच होतं. दोघांना देवळातील भाऊबीज आठवली.

त्यावेळी म्हणजे 2014 मधे नेहमीप्रमाणे भाऊ बलवंताचा फोन आला होता... हॅलो, काय कुठे भेटायचं? मी म्हटलं बाबुलनाथाच्या देवळात. तोही चक्क हो म्हणाला. त्याचं असं झालं, आम्ही तिघांनी वयाची सत्तरी ओलांडलेली. बेबी तिचं जेवण बाहेरून आणायची. मी लांबून येणार. तेव्हा घरी जेवण जमणार नव्हतं. बरं गिरगावात माहेरघर. म्हणून गिरगावातंच जमायचं असं ठरून बाबुलनाथची निवड केली. भाऊराया पुण्याहून, बोरीबंदरहून बाबुलनाथाच्या देवळात आला. मी आणि बेबी टॅक्सीने बाबुलनाथला आलो. बाबुलनाथला लिफ्ट/एलेव्हेटर असल्यामुळे वर चढून जायला नकों. म्हटलं प्रश्न सुटला. आठवलं, लहानपणी दसऱ्याला, लोण्याची पिंड बघायला धक्के खात जायचो. आज ते नव्हतं. आनंद वाटला. शंकराच्या पिंडीला चक्क हात लावून नमस्कार केला. कुणीही पुढे व्हा - पुढे व्हा म्हणून हाकाटी केली नाही. प्रदक्षिणा घालतानां मुंबई दर्शन झालं. नंतर सभामंडपात बसलो. पर्समधून छोटी ताटली, निरांजनाची वात, हळदीकुंकू, अक्षता काढले व भावाला ओवाळले. त्याला आधीच सांगितलं होतं, आता सत्तरी नंतर देवाण-घेवाण नाही. एकत्रच येऊन भोजन, गप्पा करून आनंद लुटू. ही अभिनव कल्पना त्याला तितकीशी पटली नाही. पण म्हटलं पटेल हळूहळू. लिफ्टनी खाली आलो. शेजारच्या इस्कॉनच्या श्रीकृष्णराधा-मंदिरात दर्शन घेतलं. सुंदर, स्वच्छ परिसर, पाणी व टॉयलेटची उत्तम सोय. आनंद वाटला. त्यांच्याच "गोविंदा" ह्या भोजनालयात जेवलो. आपल्या पध्दतीचं विविध प्रकारांनी युक्त असं जेवण. भाऊराया खूष झाले. आता बेबीताई आमच्यात नाही म्हणून यंदा भाऊबीज नाही. हे सर्व आठवलं. म्हटलं, तुमच्या बरोबर शेअर करू. म्हणून लिहिलं. निमंत्रणाची वाट न पाहता, दरवर्षी फोन करून बहिणींना कुठे भेटू? म्हणून भावाचं विचारणं, आमचं घराबाहेर भेटून जेवणं, गप्पा करणं आणि देवाण-घेवाण न करता आनंद लुटणं, पटतंय का तुम्हाला? कदाचित नाही. सत्तरीनंतर पटेल पुढे. खरंच खूप आनंद वाटला हे लिहून.